ISSN 2277-8721
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Bi-monthly Reviewed Journal July/Aug 2013

# महाराष्ट्रातील नागरी सहकारी बॅकांची स्थिती व गती

संशोधनकर्ती :— **प्रा. सपना वेगीनवार (येरावार)**
मार्गदर्शक :— **डॉ. किशोर मोहरीर**

## प्रस्तावना :—

भारतीय सहकारी चळवळीकडे समाजवादी समाजव्यवस्था निर्मीतीचे एक साधन म्हणुन पाहिले जाते. नागरी सहकारी पतपुरवठयांच्या क्षेत्रामध्ये नागरी सहकारी बॅकेची उल्लेखनीय प्रगती केली आहे. राष्ट्रीय ध्येयधोरणाच्या चौकटीमध्ये योजनाबध्द आर्थिक विकास घडवुन आणण्याचा सामाजीक न्यायाचा विकास घडवुन आणण्यात नागरी सहकारी बॅकांनी महत्वपुर्ण कार्य केले आहे. नागरी सहकारी बॅका या भारतीय अर्थव्यवस्थेतील बॅकिंग प्रणालीतील एक महत्वाचा घटक आहे. प्रथमत: नागरी सहकारी बॅकेची सुरवात १८ व्या शकताच्या अखेर जर्मन व इटली मधील हॉर्मन शुल्जे व लुईंग लुइझाटी या दोघांनी मध्यमवर्गियांना सावकाराच्या जाचातुन सोडवुन योग्य पतपुरवठा करण्याकरीता केली. महाराष्ट्रातील नागरी बॅकेच्या स्थापनेला १०० च्या वर वर्ष लोटली. आजतागायत या बॅका सक्षमपणे मोठया दिमाखात उभ्या आहेत. १९०४ साली विठ्ठल कवठेकर यांनी अन्योन्य सहकारी बॅक म्हणुन सुरवात केली १९१२ च्या आधुनीक सहकारी कायद्याने बिगर शेती क्षेत्रास अल्प, मध्यम, मुदती कर्ज देणे व विविध ठेवीच्या स्वरुपात ग्राहकांना बचतीची सवय लावणे हा या बॅकेचा महत्वाचा उद्देश आहे.

**उद्देश :—**

१) सभासद आणि बिगर सभासदांकडुन विविध ठेवी स्विकारणे.

२) कर्ज देणे :— नागरी सहकारी बॅकेचे दुरा महत्वाचा उद्देश आहे की ग्राहकांकडुन ठेवीच्या स्वरुपात गुंतविलेली राशी गरजु ग्राहकांना अल्प, मध्यम व मुदतीच्या

स्वरुपात विशिष्ट वस्तुंचे तारण ठेवुन दोन व्यक्तीची जामीन घेउन वितरीत केली जाते.

३) इतर सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे.

गृहितके ;भ्लचवजीमेपेद्ध :—

१) महाराष्ट्रातील नागरी सहकारी बॅकांनी ठेवी स्विकारण्याच्या बाबतीत प्रगती केलेली आहे.

२) महाराष्ट्रातील नागरी सहकारी बॅकांनी कर्ज वितरणाच्या बाबतीत प्रगती केलेली आहे.

महाराष्ट्रातील नागरी सहकारी बॅकांचा ठेवी व कर्जाचा आढावा २००९—१०

**कोष्टक क्र. १.१**

| महाराष्ट्रातील जिल्हे | शाखा | ठेवी (कोटी) | कर्ज (कोटी) |
|---|---|---|---|
| मुंबई | ७१ | ४४६५५११.९३ | २९००६८३.७२ |
| ठाणे | १८ | १०६३९४४.६० | ६२७३८७.४१ |
| रायगड | ८ | ११७५४१.१६ | ९६७८३.५२ |
| रत्नागिरी | ४ | १९५५१.५२ | १३०२६.१२ |
| सिंधुदुर्ग | २ | ४१०७.८५ | २६८०.८१ |
| नाशिक | ४६ | २९३८४५.६९ | १५७४३१.०१ |
| धुळे/नंदुरबार | १८ | ९०२८२.१४ | ६४०२३.६७ |
| जळगांव | २१ | १०८०५७.०४ | ९०८५६.६८ |
| अहमदनगर | २२ | २१९७१०.४२ | १४२०९१.२५ |
| पुणे | ५९ | १८१५४२६.१३ | १०८०२८२.७५ |
| सोलापुर | ३९ | २२५७७२.३२ | १३७२१५.६८ |
| कोल्हापुर | ५३ | ३८३९५०.७० | २१८३०६.७२ |
| सांगली | २६ | २०६१८४.६५ | ११९३४९.२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| सातारा | ३० | २८८६१६.३६ | १८४०८६.१२ |
| औरंगाबाद | १५ | ६४१८३.६० | ४३७४६.८३ |
| जालना | ६ | १६८७७.०५ | ९३५१.८३ |
| बिड | १७ | १४३३९३.९१ | ८२२९६.११ |
| नांदेड | ९ | ३०५९०.५४ | १९२१७.१९ |
| उस्मानाबाद | १२ | ६४३७१.३० | ३७५७५.८८ |
| लातुर | १७ | ४०९६९.१८ | २८००२.५६ |
| परभणी | २० | ८५१४८.५१ | ५२७९५.९७ |
| नागपुर | २१ | २१४२०६.६१ | १३०१९३.६६ |
| भंडारा | ३ | ३९८३७.३३ | २११७६.३१ |
| वर्धा | ५ | ३०५९७.३२ | २१५३६.९६ |

| महाराष्ट्रातील जिल्हे | शाखा | ठेवी (कोटी) | कर्ज (कोटी) |
|---|---|---|---|
| अमरावती | १२ | ४३५८५.७५ | २३२८३.८४ |
| अकोला/वाशिम | ८ | २७०३८३.२२ | १७०९५९.८० |
| बुलढाणा | ९ | १३९११९.३० | ८२८०७.३९ |
| यवतमाळ | ४ | ७७७३५.५६ | ५३०६८.२४ |
| चंद्रपुर | ४ | २५३८४.२० | १३४५७.७६ |
| गडचिरोली | २ | ९९९.२४ | ५८४.२७ |
| एकुण ३० जिल्हे | ५१२ | १०५८९७८५.१३ | ६६२५०६५.२९ |

वरील कोष्टक १.१ नुसार कर्जाचे ठेवीशी असलेले प्रमाण ६२ टक्के दिसुन येते. या कोष्टकात ५१२ महाराष्ट्रातील नागरी सहकारी बॅकेच्या एकुण ठेवी व कर्जाची राशी दिसत आहे. यावरुन नागरी सहकारी बॅकेला ठेवीच्या व गुंतवणुक कर्जाच्या

वितरणाबाबत रिझर्व्ह बॅकेच्या आदेशाचे पालन करावे लागते. सर्व नागरी सहकारी बॅका सुरक्षितता, तरलता, लाभदायकता या तिन सुत्रांचा अवलंब करुन बॅकेचे व्यवस्थापन करीत असतात.

नागरी सहकारी बॅका चालु, बचत, मुदत, आवर्ती अशा विविध स्वरुपाच्या ठेवी स्विकारुन गरजु ग्राहकांना अल्प, मध्यम, मुदती स्वरुपाचे कर्ज देते त्यात बॅकेला उत्पन्न प्राप्त होत तसेच राष्ट्रीयकृत बॅकेप्रमाणे ग्राहकांना विविध सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्यास जसे सुरक्षित खणांची सोयी हुंडया वटविण इत्यादी यातुन कमिशनच्याव्दारे उत्पन्न प्राप्त होत असते.

**निष्कर्ष :—**

१) महाराष्ट्रातील बहुतांश नागरी सहकारी बॅकेच्याा शाखाने कर्ज वितरणाच्या बाबतीत बॅकेच्या निर्देशाला अनुसरुन लक्षणीय प्रगती केलेली आहे आणि ही प्रगती खरोखरच वाखाणण्याजोगी आहे.

२) महाराष्ट्रातील बहुतांश नागरी सहकारी बॅकातील संचालकांनी वेळोवेळी नविननविन ठेव योजना कार्यान्वीत केल्यामुळे ठेवीच्या बाबतीत प्रगतीशील वाटचाल करतांना दिसते. ठेवी स्विकारण्याच्या मागचा उद्देश तर केवळ लोकांना बचतीची सवय लावणे हा होता.

३) महाराष्ट्रातील नागरी सहकारी बॅकानी ठेवी स्विकारण्याच्या बाबतीत, कर्ज वाटपाच्या बाबतीत प्रगतीशील वाटचाल करतांना दिसत आहे.

४) महाराष्ट्रातील काही नागरी सहकारी बॅकामध्ये ज्ड कार्डची सुविधा, कोअर बॅकिंग, क्मइपज ब्तकए ब्तमकपज ब्तकए प्दजमतदमज बॅकिंगच्या सोयींना प्राधान्य द्यावयास पाहिजे तेंव्हाच नागरी सहकारी बॅका स्पर्धेमध्ये टिकु शकतील.

५) कर्जपुरवठा करतांना रिझर्व्ह बॅकेच्या निर्बंधाला अनुसरुन कर्जदारांना कर्ज द्यावे लागते ही प्रक्रिया क्लिष्ट आहे या आवश्यक कागदपत्र जमा करावे लागते

याकरीता आवश्यक व कमीत कमी कागदपत्रे जमा करुन कर्ज दिल्यास बॅकेची प्रगती होईल.

**शिफारशी :—**

१) नागरी सहकारी बॅकेच्या व्यवस्थापक असे असावे की ज्यांच्यामध्ये कतृत्व व वक्तृत्व दोन्ही गुण असतील तसेच नियंत्रण हा ही गुण असला पाहिजे. व्यवस्थापक हा नेतृत्व करणारा असतो.

२) रिझर्व्ह बॅक ऑफ इंडियाने नागरी सहकारी बॅकेच्या कर्ज वितरणाच्या बाबतीत सुट द्यावयास पाहिजे.

३) नागरी सहकारी बॅकेच्या कर्मचाऱ्यांना योग्य वेतन दिल्यास कर्मचारी संतुष्ट राहुन योग्य कामकाज करतील तसेच वेळोवेळी त्यांना प्रशिक्षण दिल्यास त्यांना अद्यावत ज्ञान ;न्चकंजमद्ध राहील व स्पर्धेच्या युगात त्यांना काम करणे सोयीचे होईल.

४) महाराष्ट्रातील सर्व बॅकांसमोर कर्ज वसुलीची मोठी समस्या उद्‌भवत असते या करीता प्रत्येक बॅकेनी कर्ज वसुलीच्या बाबतीत एक तत्व अवलंबवावे ‘‘पहिले अर्थकारण, दुसरे ते स्थिरकरण व तिसरे ते परतकरण’’ होय असे केल्यास प्रत्येक बॅकेच्या समोरची मोठी समस्या दुर होउ शकते.

५) महाराष्ट्रातील नागरी सहकारी बॅकांना स्पर्धेत टिकुन राहायचे असेल तर बॅकेत आधुनिकीकरण, संगणकीकरण, अद्यावत ज्ञान उपलब्ध करुन दिल्यास बॅका स्पर्धेत टिकुन राहु शकतील.

**संदर्भ :—**

१) बॅका आणि वित्त व्यवहार — डॉ. रा.का. बर्वे
२) बॅकिंग— के.के. पाटील प्रा. एस.एस. सोंडगे
३) बॅकिंगचे कायदे व व्यवहार — पा.ह. वैद्य

EIIRJ Bi-monthly Journal